जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAY 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान विभाग आता 'स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी'

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ प्राधिकरणाने मंजूर केलेल्या ठरावानुसार तंत्रज्ञान विभागाच्या नावात बदल करण्यात आला आहे. त्यानुसार 'स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी' असे ठेवण्यात आले आहे. विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या दि. २३ रोजी झालेल्या बैठकीत ठराव मंजूर केला आहे. तंत्रज्ञान विभागाची स्थापना २००६-०७ या शैक्षणिक वर्षापासून अनुदान नसलेल्या तत्त्वावर करण्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षांत हजारो विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यातील अनेक जण मोठ्या पदावर आहेत तसेच अनेकांनी आपला स्वतंत्र व्यवसाय सुरू केला आहे. संबंधितांनी बदलाची नोंद घ्यावी. पुढील पत्रव्यवहार बदललेल्या नावानुसार करावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAY 2025
तरुण भारत

# तंत्रज्ञान विभाग आता 'अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान शाळा'

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागाच्या नावात बदल करण्यास शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली आहे. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात 'अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान शाळा" असे नाव होणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने परिपत्रकाव्दारे प्रसिध्द केली आहे. शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागाची स्थापना २००६-२००७ या शैक्षणिक वर्षापासून झाली आहे. हा विभाग विनाअनुदानित असून स्वतंत्रपणे चालवला जातो. येथे बारावीनंतर किंवा पदवीनंतर कोणत्याही अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येतो. महाराष्ट्र शासनाच्या प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली जाते. या विभागाच्या नावात बदल करण्यासाठी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेने मंजुरी दिली आहे. त्यामुळे यापुढे तंत्रज्ञान विभागाचे नाव 'अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान शाळा" असे ठेवण्यात आले आहे. तरी संबंधीतांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ सत्र परीक्षेला ४४ हजार विद्यार्थी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील परीक्षेला ४४ हजार ३५१ विद्यार्थी उपस्थित होते. सध्या विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु आहेत. शनिवारी बीए., बी.कॉम., बी.एस्सी., बीसीए., बीए. बीएड., बीआयडी., बीबीए., एमबीए., आदी ८० अभ्यासक्रमांच्या परीक्षा १९२ केंद्रावर पार पडल्या. तसेच आज पीजी डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम, बी. व्होक बिल्डींग टेक्नॉलॉजी, बँक मॅनेजमेंट अभ्यासक्रम विविध सत्राच्या परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले. भरारी पथकाकडून कोल्हापूर (३), सातारा (१) अशा एकूण ४ गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत झाली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल-२०२४ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. बुधवारी बी.ए., बी.कॉम., बीएसस्सी, बीसीए, बीआयडी, बीएड्, एमएड, बीबीए, एमबीए, बॅचलर ऑफ लॉ, एम.ए एम.एसडब्लू, एम. कॉम., डिप्लोमा कोर्स इन लैंग्वेज, एमआरएस आदी ८० अभ्यासक्रमाच्या परीक्षा झाल्या. ही परीक्षा १९२ परीक्षा केंद्रावर ४४ हजार ३५१ विद्यार्थ्यांनी दिली. भरारी पथकाकडून कोल्हापूर ३, सातारा १ अशा ४ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीकडे केली आहे. या विद्यार्थ्यांवर नियमानुसार कारवाई केली जाणार आहे, तरी विदयार्थ्यांनी नियमांच्या अधिन राहून परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

सकाळ

# 'डीओटी'चे नाव आता 'स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी'

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीचे (डीओटी) नाव बदलण्यात आले असून, ते 'स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी' असे करण्यात आले आहे. त्याबाबतची माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली. तत्कालीन कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या कार्यकाळात या विभागाची स्थापना २००६ ला होऊन मुला-मुलींसाठी वसतिगृहाची उभारणी सुरू झाली. त्याचवर्षी तेथे एम. टेक., तर २००८ ला बी. टेक. सुरू झाले. त्यानंतर आजतागायत एकूण ११ अभ्यासक्रम सुरू आहेत.